विशेष खटला (ला.प्र.) क्र.३/२०१९
शासन वि. राजेंद्र
नि.क्र.५३

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ ची जबानी**
**मी याद्वारे शपथेवर निवेदन करतो की,**

नाव- संजय माणिकराव यादगिरे,
वय- ६४ वर्षे,
व्यवसाय- सेवानिवृत्त,
राहणार- अमरावती.

**अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सरकारी वकिल श्री.एस.आर.मुंदडा यांच्या वतीने**

१. सन-२०१८ ते २०२० या कालावधीत शिक्षण विभागात शिक्षण उपसंचालक या पदावर कार्यरत होतो. कनिष्ठ लिपीक या पदावर नेमणूक आणि कामावरून कमी करण्याचे अधिकार विभागीय उपसंचालक म्हणून माझ्याकडे होते. राजेंद्र भुतेकर हे कनिष्ठ लिपीक पदावर वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक माध्यमिक, लातूर या पदावर कार्यरत होते. या पदाचे नियुक्ती व कामावरून कमी करण्याचे अधिकार विभागीय शिक्षण उपसंचालक म्हणून माझ्याकडे होते.

२. राजेंद्र भुतेकर यांच्या संदर्भात पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र नांदेड यांच्या कडून पत्र क्र.१६३८ हे दि.२४/०४/२०१९ रोजी माझ्याकडे कार्यालयाकडे प्राप्त झाले. ते पत्र श्री. भुतेकर यांचे संदर्भात अभियोग दाखल करण्यासाठी परवानगी मागण्याचे होते. त्या पत्रासोबत एक संचिका प्राप्त झाली. त्यामध्ये अभियोग दाखल करण्यासंदर्भातील ४० कागदपत्रे होती. संचिका प्राप्त झाल्यानंतर मी सोबत जोडलेल्या कागदपत्र व पुराव्यांचे अवलोकन केले. त्यानंतर माझ्या सद्सद विवेक बुध्दीला पटल्यानुसार अभियोग दाखल करण्याची परवानगी दिली. ती परवानगी लेखी स्वरूपात दिलेली होती. आता मला दाखविलेले कागद हा त्या परवानगीचा आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५४/सा.क्र.३** देण्यात येते. मंजूरी आदेशासोबत कव्हरिंग लेटर दिलेले होते. आता दाखविलेले पत्र तेच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५५/सा.क्र.३** देण्यात येते. मी प्रकरणाची मुळ संचिका आज माझ्यासोबत आणलेली आहे.

**सरतपास पूर्ण.**

विशेष खटला (ला.प्र.) क्र.३/२०१९
शासन वि. राजेंद्र
नि.क्र.५३

<u>उलट तपास आरोपी करिता विधीज्ञ श्री.एस.व्ही.देसाई यांच्या वतीने</u>

३. मी तक्रारदार याची मुळ तक्रार पाहिलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारीमध्ये आरोपी भुतेकर याचे नाव नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या तक्रारी मध्ये रू.२,०००/- मागितल्याचा उल्लेख नाही. साक्षीदार पुढे सांगतो की, पैसे मागितल्याचा उल्लेख आहे. मला मंजूरी देण्यापूर्वी न्यायवैधक अहवाल मिळालेला नव्हता. न्यायालयाच्या संचिकेमधील पोलीस कागदपत्रातील पान क्र.६९ वरील टिप्पणी दाखविण्यात आली.

प्रश्न- तुम्हाला या कागदपत्रातील आरोपीने केलेल्या टिप्पणी बाबत काय सांगायचे आहे ?

उत्तर- मला त्याबाबत कोणतेही भाष्य करायचे नाही.

प्रश्न- तुमच्या मंजूरी आदेशामध्ये सेक्शन–२ काय आहे माहित आहे का?

उत्तर- मला सेक्शन-२ माहित नाही.

प्रश्न- तुम्हाला सेक्शन-२ खाली मंजूर आदेश देता येत नाही ?

उत्तर- मला भाष्य करता येत नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, मी दिलेला मंजूर आदेश हा चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कागदपत्राचा अभ्यास न करता चुकीचा मंजूर आदेश दिलेला आहे.

**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PADMAKAR PRABHAKAR KESTIKAR
Date: 2026.01.05 13:04:01 +0530

(पी.पी.केस्तीकर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
लातूर

दि.०५/०१/२०२६